तात्काळ

# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.नि.वि.वि/५०६/29/२०१३

**परिपत्रक :-**

विषय :- विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर गुणवंत शिक्षकेतर कर्मचा-यांची शिफारस करणेबाबत.

संदर्भ :- विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.नि.वि.वि./५०६/१२/२०१३ दिनांक २५ जून २०१३

महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर सन २०१३-१४ करिता "गुणवंत शिक्षकेतर कर्मचा-यांचा" विद्यापीठातर्फे, विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर निवड करून, सदर निवड झालेल्या गुणवंत शिक्षकेतर कर्मचा-यांचा प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते.

या परिपत्रकांद्वारे आपणांस कळविण्यात येते की, विशेष गुणवत्ता व अर्हता धारण केलेल्या एक किंवा दोन शिक्षकेतर कर्मचा-यांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे ३ प्रतित पाठविण्याची मुदत दि. ५ ऑक्टोबर २०१३ पर्यंत वाढविण्यात येत आहे. आपल्या महाविद्यालयातील योग्य शिक्षकेतर कर्मचा-यांबाबतचे प्रस्ताव निर्धारित वाढीव मुदतीत विद्यापीठाकडे पाठवावेत. उपरोक्त संदर्भातील परिपत्रक व सुधारित जोडपत्र संकेत स्थळ www.mu.ac.in वर उपलब्ध आहे.

आपणांस अशी विनंती करण्यात येते की, ज्या महाविद्यालयीन शासनमान्य व अनुदानित व विनाअनुदानित संलग्नित महाविद्यालयातील ज्यांची किमान **२० वर्षे सेवा** झालेली आहे, ज्यांनी विशेष गुणवत्ता व अर्हता धारण केली आहे अशा एक किंवा दोन पात्र शिक्षकेतर कर्मचा-यांचे प्रस्ताव विद्यापीठाला **३ प्रतित दि. ५ ऑक्टोबर २०१३ पर्यंत** वाढवलेल्या मुदतीत पाठवावेत.

तसेच ज्या शिक्षकेतर कर्मचारी यांची शिफारस करावयाची, त्यांची माहिती सोबत जोडलेल्या अर्जामध्ये नेमणूकीच्या पत्राची प्रत, तसेच अन्य सर्व कागदपत्रांच्या सत्य प्रती तसेच पोलिस अहवाल, **सहप्रस्तावासोबत ३ प्रतित** पाठविणे आवश्यक आहे. (तसेच संबंधित कर्मचा-यांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/त्यांचा दुरध्वनी क्रमांक/महाविद्यालयांचा दुरध्वनी क्रमांक व घरचा पूर्ण पत्ता) स्वतंत्र पानावर लिहून जोडण्यात यावा.

यापुर्वी ज्या महाविद्यालयाने शिक्षकेतर कर्मचा-यांचे प्रस्ताव पाठविले आहेत, त्यांनी पुनश्च: प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही. तसेच त्यांनी सुधारित जोडपत्राच्या अनुषंगाने विचारलेली अतिरिक्त माहिती त्वरित सादर करावी.

उपकुलसचिव
(विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग)

मुंबई - ४०० ०३२
१९ सप्टेंबर २०१३

प्रति :-

प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित तसेच शासनमान्य कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालये. (उपरोक्त संदर्भातील परिपत्रक व जोडपत्र विद्यापीठाचे संकेत स्थळ www.mu.ac.in वर उपलब्ध आहे.)

# मुंबई विद्यापीठ

अंतिम दिनांक <u>५ ऑक्टोबर २०१३</u>

सन २०१३-१४ करिता गुणवंत पुरस्कार, आपल्या महाविद्यालयातील शिफारस करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची खालील प्रमाणे सविस्तर माहिती दिनांक <u>५ ऑक्टोबर २०१३</u> पर्यंत सहाय्यक कुलसचिव विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागाकडे सादर करावी.

<u>अनु. क्र.</u>

१. कर्मचाऱ्यांचे संपुर्ण नाव: श्री./श्रीमती ......................................................................
सेवा पुस्तिका क्रमांक.............................................कर्मचारी संकेतांक क्र. : ............

२. महाविद्यालयातील कायमस्वरुपी तत्वावरील नियुक्तीचा दिनांक :..................................
वेगवेगळ्या पदांच्या कामांचा कालावधी:- ................................................................

३. सेवेतील कालावधी :.................................. वर्षे :...............................

४. सध्याचा हुद्दा : ..........................................................................................................

५. कार्यालयीन उपस्थिती नियमित व वक्तशिरपणा तसेच रजा संपवण्याचा कल (याबाबत सविस्तर टिपण्णी सादर करावी.) : ...................................

६. वर्तणुक : - सौजन्यशिल व नम्रता आणि कामाची अडचण सोडविण्याच्या दृष्टीने उचललेली पाऊले, विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना सहाय्य करणेबाबत.

७. कार्यालयीन कामकाजातील वक्तशीरपणा :- परिणामकारक कार्यक्षमता, कार्यतत्परता, तसेच महाविद्यालयीन, विद्यापीठ, तसेच शासकीय कार्यालयाशी विशेष सहभाग व महाविद्यालयीन परिक्षांमध्ये विशेष सहभाग, उत्साहाने जबाबदारी तसेच आज्ञाधारक, नेतृत्व पुढाकार व इतर कर्मचारी यांच्याबद्दल असलेले संबंध समुहात काम करण्याची आवड, काळजीपूर्वक काम करण्याची आवड (याबाबत सविस्तर टिपण्णी सादर करावी.)

८. शिस्तभंगाची कारवाई अथवा ज्ञापन देण्यात आले आहे का? होय/नाही
असल्यास त्याबाबतची माहीती : ...........................................................................

९. शैक्षणिक अर्हता, गुणवत्ता वाढविण्याचे प्रयत्न, सेवेत असताना मिळविलेल्या पदव्या व पदविका, कार्यशाळा शिबिरे यामध्ये सहभाग, संगणक कौशल्य :- (कृपया जुजबी, पारंगत, उत्कृष्ठ, उत्तम विशेष नैपुण्य चा उल्लेख करावा.)याबाबत सविस्तर टिपण्णी सादर करावी

११ पोलीस अहवाल : .........................................................................................

११ सेवेत असताना यापूर्वी पारितोषिक/बक्षिस प्राप्त झाले आहे का? होय/नाही
असल्यास सविस्तर माहिती तसेच प्रती सादर कराव्यात : ..................................................

१२ प्राचार्य यांची शिफारस : ......................................................................
महाविद्यालय सेवेत नाविन्यपूर्ण, : ......................................................................
कौशल्यपुर्ण आणि आदर्शवत ......................................................................
केलेल्या कामाची सविस्तर माहिती देणे. ......................................................................

प्राचार्य
(महाविद्यालयाचा शिक्का)

**********************************************